**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 26/08/2016 रोजी भरलेल्या माहे ऑगस्ट महिन्याच्या सर्वसाधारण तहकुब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| विषय क्र. 03.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक 04/08/2016 रोजीचा ठराव क्र. 2:-<br>अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरु खेळाडूंना प्रशिक्षण व इतर बाबीसाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत आयुक्तांचे दिनांक 28/07/2016चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./445/2016. |
| ठराव क्र. 1197.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे, सदरहू खेळाडुंना अर्थसहाय्य करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च सन 2016-17 या आर्थिक वर्षापासून क्रिडा व सांस्कृतिक विभागाकडील क्रिडा शिष्यवृत्ती/ खेळाडुंना आर्थिक सहाय्य या लेखा शिर्षाखाली तरतुद रक्कम रु. 25.00 लक्ष मधुन भागविता येईल व यापुढेही याच लेखा शिर्षाखाली त्या-त्या वर्षातील तरतुद रकमेमधून सदरचा खर्च भागविण्यात येईल. तरी, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील होतकरु खेळाडूंना अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरु खेळाडुंना प्रशिक्षण व इतर बाबींसाठी अर्थ सहाय्य देण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाब क्रमांक 1 ते 6 पैकी बाब क्रमांक 3(1) मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे संबंधीत खेळाडू/पालक हा नवी मुंबई महापालिका क्षेत्रात किमान 15 वर्षा ऐवजी 2 वर्षाचा रहिवाशी असावा बाब क्रमांक 3(2) मध्ये सदर खेळाडूंनी मागील तीन वर्षात कनिष्ठ/वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करून किमान एकदा पदक / प्राविण्य मिळविणे अवश्यक आहे, याऐवजी सदर खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा, बाब क्रमांक 3(6) खेळाडू स्वत: शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास सदरचे आर्थीक सहाय्य मिळणार नाही ही अट वगळण्यास तसेच बाब क्रमांक 5 मध्ये प्रस्तावित निवड समितीत मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, मा.सभापती क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांचा समावेश करण्यास, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यांत यावी. " |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| विषय क्र. 04.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक 04/08/2016 रोजीचा ठराव क्र. 3:-<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विदयार्थी खेळाडूंना सुधारीत क्रीडा शिष्यवृत्ती लागू करणेबाबत आयुक्तांचे दिनांक 28/07/2016चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ./447/2016. |
| ठराव क्र. 1198.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थी खेळाडुंना सुधारीत क्रिडा शिष्यवृत्ती लागू करणेबाबतच्या प्रस्तावित क्रिडा शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा वार्षिक खर्च क्रिडा व सांस्कृतिक विभागाकडील क्रिडा शिष्यवृत्ती/खेळाडुंना आर्थिक सहाय्य या लेखा शिर्षाखाली तरतुद रक्कम रु. 25.00 लक्ष मधुन भागविता येईल व यापुढेही याच लेखा शिर्षाखाली त्या-त्या वर्षातील तरतुद रकमेमधून सदरचा खर्च भागविण्यात येईल. तरी नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील उदयोन्मुख व होतकरु खेळाडुंना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे याकरीता स्पर्धा आयोजना बरोबरच आर्थिक मदत सुध्दा करता यावी. याकरीता शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या धर्तीवर सुधारीत क्रिडा शिष्यवृत्ती प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह लागू करण्यास, तसेच यापुढे दर तीन वर्षानी 25 टक्क्यांनी क्रिडा शिष्यवृत्ती रकमेत वाढ करण्यास तसेच प्रस्तावित अटी/शर्ती पैकी अट क्रमांक 17 मध्ये खेळांडूची कामगिरी उपरोक्त निकषावर तपासून शिष्यवृत्ती मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील या ऐवजी मा.सभापती, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांना असतील अशी दुरूस्ती करण्यास या उपसुचनेसह सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यांत यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 05.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नमुंमपाच्या सर्व रुग्णालयांकरीता आवश्यक उपकरणे/इन्स्ट्रयुमेंटस् खरेदी करणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 27/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/4800/2016. |
| ठराव क्र. 1199.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपलिकेच्या सर्व रुग्णालयांच्या विविध विभागांकरीता आवश्यक उपकरणे/इन्स्ट्रयुमेंटस् खरेदी करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 42 कोटी, 01 लाख, 10 हजार, 413 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी" |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| विषय क्र. 06.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | झुणका भाकर केंद्राच्या ठिकाणी इतर आहार योजना सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 28/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/2100/2016. |
| ठराव क्र. 1200.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "झुणका भाकर केंद्राच्या ठिकाणी इतर आहार योजना सुरु करण्यास, जागा अन्नदाता योजनेंतर्गत "जसे आहे तसे" या तत्वावर उपरोक्त अटी/शर्तीनुसार चालविण्यास देण्यासाठी, तसेच प्रस्तावातील अट क्र. 2 मध्ये नमुद केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेचे रहिवाशी, अपंग व महिला बचत गट, महानगरपालिकेने अर्थसहाय्य दिलेले लाभधारक व पूर्वीचे झुणका भाकर केंद्र चालक यांना प्राधान्य देणे या ऐवजी पुर्वीचे 22 झुणका भाकर केंद्र चालकांना व स्थानिक प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यास, अट क्र. 3 मध्ये नमुद केल्यानुसार चालू बाजारभावाप्रमाणे (रेडी रेकनर दराने) या ऐवजी ठाणे व मुंबई महानगरपालिकेप्रमाणे रू. 500/- इतके भुईभाडे आकारण्यास, अट क्र. 20 मध्ये नमुद केल्यानुसार प्रस्तावित विलंब शुल्क 10% ऐवजी शासनाच्या नियमानुसार 2% आकारण्यास आणि अट क्र. 22 मध्ये प्रस्तावित परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲण्ड लायसन) च्या अटी व शर्ती ठरविण्याचा आणि केंद्र चालक व मनपा यामध्ये कोणतेही वाद झाल्यास या संबंधीतील अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त ऐवजी मा. सर्वसाधारण सभेस असेल या उपसूचनेसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 07.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बेलापूर विभागातील रमाबाई आंबेडकरनगर व संभाजीनगर येथे मलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./983/2016. |
| ठराव क्र. 1201.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बेलापूर विभागातील रमाबाई आंबेडकर नगर व संभाजी नगर येथे मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 94 लाख, 33 हजार 657 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 08.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2015-2016 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/984/ 2016. |
| ठराव क्र. 1202.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2015-16 या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 67 अे अन्वये, राज्य शासनाकडे पाठविण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>स्थगित</u> |

| | |
|---|---|
| विषय क्र. 09.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील किऑक्स/दुकान-गाळे/कार्यालये 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह अॅण्ड लायसन) तत्वावर देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 01/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/2183/2016. |
| ठराव क्र. 1203.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील किऑक्स/दुकान-गाळे/कार्यालये 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह अॅण्ड लायसन) तत्वावर देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 नुसार महापालिकेचे व्यावसायिक दुकान गाळे जाहिर निविदा प्रसिध्द करुन, चालू बाजारभावापेक्षा (रेडी रेकनर दर) स्पर्धात्मकरित्या जादा दर देणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना 05 वर्षासाठी वितरित करण्याचे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 प्रमाणे संविदा करण्याचे अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना प्रदान करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |
| विषय क्र. 10.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | ऐरोली विभागातील समतानगर, साईनाथवाडी, ऐरोलीनाका व गणपती कॉलनी येथे वैयक्तिक शौचालय (IHHL) बांधणेकरीता मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/1007/2016. |
| ठराव क्र. 1204.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "ऐरोली विभागातील समतानगर, साईनाथवाडी, ऐरोलीनाका व गणपती कॉलनी येथे वैयक्तिक शौचालय (IHHL) बांधणेकरीता मलनि:स्सारण वाहीनी टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 87 लाख, 67 हजार, 793 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |
| विषय क्र. 11.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जॉगिंग ट्रॅक, बस स्थानके व सार्वजनिक उपयोगाच्या ठिकाणी स्टेनलेस स्टील धातू पासून तयार केलेले लिटर बिन्स बसविण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/घकव्य/1050/2016. |
| ठराव क्र. 1205.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जॉगिंग ट्रॅक, बस स्थानके व सार्वजनिक उपयोगाच्या ठिकाणी स्टेनलेस स्टील धातू पासून तयार केलेले लिटर बिन्स बसविण्यास, तसेच तरी 800 नग स्टेनलेस स्टिलच्या बिन्सचा पुरवठा करणे व नमुंमपा निर्धारित करून देईल त्या ठिकाणी खडडा खोदून सिमेंट कॉंक्रिटने बिन्स बसविणे इत्यादी करीता प्रती नग रूपये 7659/- प्रमाणे अंदाजपत्रकिय एकूण रक्कम रू. 61 लाख, 27 हजार, 200 मात्र इतक्या रकमेस आधारभुत धरून E-Tendering कार्यालयीन प्रणाली नुसार स्पर्धात्मक निविदा मागविण्यास व सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सन 2016-17 मधील अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष क्र. CE/A20/2124 "कचरा कुंडी खरेदी" 500 लक्ष मधील तरतुदी मधुन भागविण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |

| | |
|---|---|
| विषय क्र. 12.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या नुतन मुख्यालयातील हाऊसकिपिंगची कामे कंत्राटी तत्वावर करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/घकव्य/ 1051/2016. |
| ठराव क्र. 1206.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या नुतन मुख्यालयातील हाउसकिपींगची कंत्राटी कामे Area Basis वर करणेकरीता बृहन्मुंबई बांधकाम विभागाची दरसुची सन 2016-2017 व यावुर्वी प्रस्तावात नमुद दरानुसार असून, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, अंदाजकीय खर्च रक्कम रु. 99 लाख, 83 हजार, 304 मात्र × 3 वर्ष = रक्कम रु. 2 कोटी, 99 लाख, 49 हजार, 912 मात्र इतक्या खर्चास, सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यास आणि यासाठी गेल्या 2 वर्षापासून कार्यरत 70 कामगार आहेत तसेच ठेवण्यास आणि सदर कामगारांना किमान वेतन कायदयानुसार वेतन आणि वेतनाचा फरक पुर्वलक्षी प्रभावाने अदा करण्यास सुचविल्याप्रमाणे उपसुचनेसह मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |
| विषय क्र. 13.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | सार्वजनिक रुग्णालय नेरुळ व ऐरोली करीता मेडिकल गॅसेसपाईपलाईन सिस्टीम कार्यान्वीत करणेकरिता प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/5051/2016. |
| ठराव क्र. 1207.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रूग्णालय नेरूळ व ऐरोली करीता मेडिकल गॅसेसपाईपलाईन सिस्टीम कार्यान्वीत करण्याच्या कामासंबंधातील, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 11 कोटी, 41 लाख मात्र इतक्या खर्चास, आणि प्रस्तावित एचटीएम 02-01 समवेत डिन प्रणाली-ड्रॅगर इंडिया लिमिटेड-आयएसओ, एनएसपीए या टेक्नॉलॉजीचा निविदा प्रक्रियेत स्पर्धा होणेसाठी समाविष्ट करण्यास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी |
| निर्णय - | मंजूर |
| विषय क्र. 14.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | घणसोली विभागातील नोसिलनाका येथे वैयक्तिक शौचालय (IHHL) बांधणेकरिता मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, नादुरुस्त झालेल्या रस्त्याची सुधारणा करणे, रस्त्यालगत आर.सी.सी. ड्रेन, फुटपाथ व डक्ट बांधणे व विदयुतीकरणाची कामे करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1010/2016. |
| ठराव क्र. 1208.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "घणसोली विभागातील नोसिलनाका येथे वैय़क्तिक शौचालय (IHHL) बांधणेकरीता मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, नादुरूस्त झालेल्या रस्त्याची सुधारणा करणे, रस्त्यालगत आर.सी.सी ड्रेन, फुटपाथ व डक्ट बांधणे व विद्युतीकरणाची कामे करण्याच्या कामासंबंधीतील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 6 कोटी, 74 लाख, 30 हजार, 604 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |

| | |
|---|---|
| विषय क्र. 15.<br>दिनांक 16 ऑगस्ट 2016 | तुर्भे विभागातील सानपाडा सेक्टर-20 येथील मलप्रक्रिया केंद्रापासून ते जुईनगर सेक्टर- 22 पर्यंत 1400 मी.मी. व्यासाची मलनि:सारण वाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1012/2016. |
| ठराव क्र. 1209.<br>दिनांक 26 ऑगस्ट 2016 | "तुर्भे विभागातील सानपाडा सेक्टर- 20 येथील मलप्रक्रिया केंद्रापासून ते जुईनगर सेक्टर-22 पर्यंत 1400 मी.मी व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 64 लाख, 36 हजार, 540 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका